

# विद्यापीठ बहरले

## पाणवठे झाले ओव्हरफ्लो, नेत्रसुखद हिरवळीचा चौफेर गालीचा

कोल्हापूर : संगीतशास्त्र विभागाच्या मागील बाजूस असणाऱ्या तलावाचे विहंगम दृश्य. (सर्व छाया : एस. अली)

कोल्हापूर / प्रतिनिधी :

गेल्या काही दिवसांत तुफान बरसलेला पावसाने पाणीदार असे शिवाजी विद्यापीठ बहरून गेले आहे. ओव्हर फलो झालेली शेततळी, तुडुंब भरलेल्या विहिरी, नेत्रसुखद हिरवळीचा चौफेर पसरलेला गालीचा, परिसरात कोसळणारे लहान-मोठे धबधबे आणि दूरून येणारे मोरांचे आवाज, यामुळे शिवाजी विद्यापीठाचा परिसर बहरून गेला आहे. अनेकांना विद्यापीठाच्या या सौंदर्यपूर्ण परिसराने मोहिनी घातली आहे.

शिवाजी विद्यापीठाचा परिसर मुळातच सौंदर्याने नटलेला. येथील अनेक इमारतींनी विद्यापीठाच्या सौंदर्यात भर पडली आहे. अलीकडील चार वर्षांत शिवाजी विद्यापीठाने पाण्यामध्ये स्वयंपूर्ण होण्यासाठी पावले उचलण्यास सुरुवात केली. त्यानुसार विद्यापीठाच्या सुमारे ८५३ एकराच्या विविध भागात शेततळी निर्माण करण्यात आली, तर नवीन विहिरी खणणे आणि जुन्या विहिरींचे पुनरुज्जीवन करण्याचा कार्यक्रम करण्यात आला. त्याचबरोबर भूजल पातळी वाढावी, यासाठी उतारावर चरी खोदण्यात आल्या. त्यामुळे विद्यापीठाच्या भूजल पातळीमध्ये वाढ झालेली आहे.

त्यामुळे येथील वृक्षसंपदेत वाढ झाली आहे, तर परिसरात हिरवळ निर्माण झालेली आहे. वाढलेल्या वृक्षसंपदेमुळे मोरांच्या संख्येमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे विद्यापीठाच्या सर्वच भागात मोरांचे दर्शन आणि आवाज येत आहेत.

विद्यापीठातील पाणवठे तुडुंब भरून ओव्हरफ्लो होत असल्याने त्याचे विहंगम दृश्य दिसत आहे. संगीत शास्त्र विभागाच्या पाठीमागील तलावाजवळ फोटो आणि सेल्फी घेण्यासाठी तरुणाईची दिवसभर गर्दी होते, तर भाषा भवनाच्या पाठीमागील बाजूस प्रवाहित झालेले धबधबे अनेकांचे मन मोहून घेत आहेत. पूर्ण क्षमतेने भरलेल्या पाणवठ्यामुळे विद्यापीठाचा पाणी प्रश्नही सुटला आहे.



कोल्हापूर : वि. स. खांडेकर भाषा भवनाच्या पाठीमागे असणारे शेततळे.

# विद्यापीठात ग्रंथालय कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाच्या ५६ व्या वर्धापनदिनानिमित्त प्रमोशन ऑफ ॲकॅडमिक इन्टेग्रीटी ॲंड प्रेव्हेंशन ऑफ प्लॅगारीझम इन हायर एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स, रेग्युलेशन्स' या विषयावर राज्यस्तरीय एक दिवसीय कार्यशाळा झाली.

ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्र व शिवाजी विद्यापीठ कॉलेज लायब्ररीयन असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने कार्यशाळा झाली. शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागप्रमुख डॉ. शालिनी लिहीतकर, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत, सुक्लाचे अध्यक्ष डॉ. आडाव, आर. पी. डॉ. बनसोडे उपस्थित होते. कार्यशाळेसाठी डॉ. एस. के. सावनूर, डॉ. एस. वाय. बनसोडे, डॉ. डी. बी. सुतार यांनी वाङमय चौर्य व संशोधन या विषयावर विवेचन केले.